**रे.दि.मु.नं. ४३५/२०१८ मधील नि. २० खालील आदेश**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादीतर्फे कैफियत व म्हणणे देणेस झालेला विलंब माफ होणेसाठी व कैफियत व म्हणणे स्वीकारणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात प्रतिवादीचे कथन की, वादींनी सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीद मिळणेसाठीचा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचे संदर्भातील महत्वाची कागदपत्रे वेळेत मिळू शकली नसल्यामुळे दाव्याची संपूर्ण माहिती घेणे कठीण झाले होते. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे मुदतीत देता आले नाही. त्यामुळे मे. न्यायालयाने प्रतिवादीविरुध्द विनाकैफियत, विना म्हणणेचा आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी यांनी जाणूनबुजून अथवा मुद्दामहून कसलाही कैफियत व म्हणणे देणेस विलंब केलेला नाही. त्यामुळे दाव्याचे कामकाज गुणागुणावर चालणेसाठी व नैसर्गिक न्याय मिळणेसाठी विना कैफियत व विना म्हणणेचा आदेश रद्द होऊन झालेला विलंब माफ होऊन मिळणे जरूरीचे झाले आहे, अन्यथा प्रतिवादी यांचे कधीही न भरून येणार नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

३. सदर अर्जास वादीतर्फे अर्जावरच म्हणणे देण्यात येवून सदर अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असून तो वादींना मान्य व कबूल नाही. प्रस्तुत दाव्याच्या संदर्भातील महत्वाची कागदपत्रे प्रतिवादी यांच्याकडेच आहेत. तसेच कैफियत व म्हणणे देणेस किती दिवसांचा विलंब झाला आहे व विना कैफियत व विना म्हणणे आदेश केंव्हा झाला आहे, हे अर्जात जाणूनबुजून नमूद केलेले नाही. सबब अर्ज नामंजुर करणेत यावा, अशी विनंती केली आहे.

४. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी कैफियत व ताकीद अर्जास म्हणणे न दिलेमुळे त्यांचेविरुध्द विनाकैफियत व विनाम्हणणे आदेश पारीत करण्यात आला आहे, तसेच त्यांना कैफियत व म्हणणे देणेस विलंब झाला आहे, असे शपथेवर कथन केले आहे तसेच त्यांच्या कथनांच्या पृष्टर्थ नि. २१ कडे शपथपत्र दाखल केले आहे. अशा

प्रकारच्या अर्जाबाबत अत्यंत तांत्रिक व ताठर भुमिका घेणे योग्य होणार नाही. उलटतपक्षी न्यायालयाने दाव्यातील परिस्थिती विचारात घेऊन पक्षकारांना न्याय मिळेल अशा प्रकारव्या भुमिका घेणे आवश्यक आहे. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वर्तनाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, प्रस्तुतचा अर्ज करण्यासाठी प्रतिवादी यांनी जाणीवपुर्वक अथवा हेतूपुरस्पर उशीर केलेला नाही. प्रस्तुतचा दावा हा वादींनी प्रतिवादी विरूध्द निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलला आहे. सबब दाव्याच्या संपूर्णपणे व कायमस्वरूपी निकाल होणेसाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक व जरूरीचे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केलेस वादींचे काही नुकसान होणार नाही. सबब, मी खालिल आदेश न्यायाच्या दृष्टीने पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी यांनी वादींना रूपये २,००/- खर्च दिलेस मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत व विनाम्हणणेचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे देणेस झालेला विलंब माफ करण्यात येतो.

(आर.बी.खंदारे)

दिनांक २७.०३.२०१९. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सांगोला.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. K. Torane |
| (b) | Court | : | Shri. R.B. Khandare,<br>II Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 27.03.2019 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 28.03.2019 |